# दैनिक हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. २५ जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ९५ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


## विद्यार्थिनीला मारहाण; अपमान असहाय्य, मुलीची आत्महत्या

**उत्तर प्रदेश :** मुझफ्फरनगरमधील इयत्ता चौथीत शिकणाऱ्या १० वर्षांच्या मुलीने दिनांक १० जुलै रोजी तिच्या राहत्या घरी आत्महत्या केली. शाळेतील शिक्षकांनी मारहाण तसेच १० रुपये चोरल्याचा आरोप करून सर्वांसमोर अपमानित केले यानंतर काही तासांतच तिने टोकाचे पाऊल उचलले.मुलीच्या वडिलांनी केलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी बुधवारी रात्री दोन सरकारी शाळेतील शिक्षकांविरुद्ध एफआयआर दाखल केला आहे.

## तुझ्या आईचे गावात बऱ्याच लोकांशी प्रेमसंबंध, म्हणून... पतीस जन्मठेप

**धुळे :** अनैतिक संबंधाचा संशय घेऊन पत्नीची हत्या करणाऱ्या नराधम पतीस जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. साक्री तालुक्यातील डांग शिरवाडे येथील मंदाबाई दिलीप सोनवणे या ४८ वर्षीय महिलेची तिच्याच पतीने हत्या केली होती. या नराधम पतीस प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश धुळे श्रीमती एस. एस. भिष्म यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. या गुन्ह्यामध्ये सरकारी वकील गणेश पाटील यांनी उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाचे संदर्भ देत या गुन्ह्यामध्ये आरोपीस कठोर शिक्षा देण्याची मागणी केली.

# न्यायालयाच्या कामकाजाचे व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट करण्यास बंदी

## परवानगीशिवाय शेअर केल्यास होणार कारवाई

**नवी दिल्ली:** न्यायालयीन कामकाजाचे व्हिडिओ, ऑडिओ क्लिप्स आणि थेट प्रक्षेपणाचे (लाइव्ह-स्ट्रीम) चित्रीकरण परवानगीशिवाय सोशल मीडियावर पोस्ट करण्याविरोधात सर्वोच्च न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कठोर आदेश जारी केला आहे. यापुढे न्यायालयाच्या कामकाजाचे कोणतेही रेकॉर्डिंग पूर्वपरवानगीशिवाय डिजिटल प्लॅटफॉर्मवर शेअर किंवा प्रसारित केल्यास कठोर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. न्यायालयाची प्रतिष्ठा जपण्याच्या आणि कामकाजाचा गैरवापर रोखण्याच्या दिशेने हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

काय आहेत सर्वोच्च न्यायालयाचे नवीन नियम?

भारताचे सरन्यायाधीश आणि न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने आपल्या आदेशात स्पष्ट केले आहे की, सर्वोच्च किंवा कोणत्याही उच्च न्यायालयाच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण (लाइव्ह-स्ट्रीम) किंवा रेकॉर्डिंग परवानगीशिवाय सोशल मीडिया किंवा इतर कोणत्याही डिजिटल प्लॅटफॉर्मवर पोस्ट, रिपोस्ट, अपलोड किंवा शेअर करता येणार नाही. इतकेच नाही, तर अशा व्हिडिओंमधून कोणत्याही स्वरूपात पैसे कमावण्यावरही पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. हा नियम मोडायचा असेल, तर संबंधित न्यायालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील. यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या प्रकरणात 'सेक्रेटरी जनरल'ची तर उच्च न्यायालयांच्या प्रकरणांमध्ये संबंधित उच्च न्यायालयाच्या 'रजिस्ट्रार जनरल'ची परवानगी घेणे आवश्यक असेल. ही परवानगी घेतल्याशिवाय कोणताही व्हिडिओ किंवा ऑडिओ इंटरनेटवर शेअर करता येणार नाही.

### बंदी घालण्याचे मुख्य कारण काय?

**न्यायसंस्थेच्या मते, अनेकदा न्यायालयाच्या थेट प्रक्षेपणातून (लाइव्हस्ट्रीममधून) एखादी छोटी क्लिप किंवा छोटा भाग काढून तो एडिट केला जातो. व्हिडिओ किंवा ऑडिओमध्ये फेरफार करून किंवा तो वेगळ्याच संदर्भात सादर करून सोशल मीडियावर व्हायरल केला जातो. अशा अपूर्ण, छेडछाड केलेल्या किंवा बदल केलेल्या व्हिडिओंमुळे समाजात गैरसमज पसरू शकतात आणि थेट न्यायिक प्रक्रियेवर किंवा निकालांवर विपरीत परिणाम होऊ शकतो. हा अनधिकृत वापर थांबवण्यासाठीच सर्वोच्च न्यायालयाने हे कठोर निर्बंध लागू केले आहेत.**




**वृत्तवार्तांकनावर परिणाम होणार का? :**

या आदेशामुळे सर्वसामान्य नागरिकांना आणि सोशल मीडिया युजर्सना जरी निर्बंधांचा सामना करावा लागणार असला, तरी न्यायालयाचा हा आदेश वृत्तसंस्था आणि प्रसारमाध्यमांच्या पत्रकारितेला लागू होणार नाही. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की, या निर्णयाचा वृत्त वार्तांकनावर किंवा बातमी प्रसारावर कोणताही परिणाम होणार नाही. म्हणजेच, वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि अधिकृत वृत्तसंस्था पूर्वीप्रमाणेच न्यायालयीन कामकाजाशी संबंधित कायदेशीर घडामोडींच्या बातम्या प्रसिद्ध आणि प्रसारित करू शकतील. ही बंदी केवळ अनधिकृत ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंगचा वापर, शेअरिंग आणि त्यातून होणारी कमाई यावरच लागू आहे.

**पुढील कायदेशीर कारवाई आणि निर्देश :**

सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर न्यायालयीन कामकाजाच्या व्हिडिओंच्या अनधिकृत वितरणाला आळा घालण्याची मागणी करणाऱ्या एका याचिकेवर सुनावणी सुरू असताना न्यायालयाने हे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि सर्व राज्यांच्या सरकारांना नोटीस बजावून त्यांचे उत्तर मागितले आहे. यापुढे असा अनधिकृत वापर रोखण्यासाठी नेमक्या कोणत्या प्रभावी उपाययोजना करता येतील, हे सरकारांना स्पष्ट करावे लागेल. तसेच, या निर्णयाची व्यापक प्रसिद्धी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे महासचिव आणि सर्व उच्च न्यायालयांच्या रजिस्ट्रार जनरल यांना हा आदेश आपापल्या न्यायालयांच्या अधिकृत वेबसाइटवर ठळकपणे प्रसिद्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## थोडक्यात वार्ता

### चिमनापूर येथील शिक्षक समाधान सोनवणे यांचा अपघाती मृत्यू



**कन्नड :** तालुक्यातील चिमनापूर येथील रहिवासी तथा लासूर स्टेशन येथील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेले शिक्षक समाधान रतन सोनवणे (वय अंदाजे ३३) यांचा गौताळा अभयारण्याच्या कमानीजवळ दि २४ रोजी सकाळी झालेल्या दुर्दैवी दुचाकी अपघातात मृत्यू झाला. समाधान सोनवणे यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि दोन लहान मुले असा परिवार आहे. कर्तव्यावर जात असतानाच काळाने घाला घातल्याने चिमनापूरसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. माहितीनुसार, समाधान सोनवणे हे शुक्रवारी सकाळी सुमारे ७ वाजता चिमनापूर येथील आपल्या घरातून दुचाकी (क्र. एमएच-४६ बीई ०५६५) वरून लासूर स्टेशन येथील जिल्हा परिषद शाळेत कर्तव्यावर जाण्यासाठी निघाले होते. मात्र गौताळा अभयारण्याच्या कमानीजवळ त्यांच्या दुचाकीचा भीषण अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच फौजदार त्रिलोकचंद पवार घटनास्थळी दाखल झाले व पुढील कार्यवाही करण्यात आली.

### नाशिक येथे झाड कोसळले, 8 ते 10 वाहनांचे नुकसान



**नाशिक :** नाशिक जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात भलेमोठे लिंबाचे झाड कोसळल्याची घटना घडली आहे. येथील पार्किंग मध्ये असलेले एक भलेमोठे लिंबाचे झाड अचानक तेथे उभ्या असलेल्या चारचाकी वाहनांवर कोसळले. हे झाड कोसळून ८ ते १० वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातील पार्किंगमध्ये अनेक शासकीय अधिकारी आणि कामानिमित्त आलेल्या नागरिकांची वाहने उभी होती. मात्र अचानक पार्किंगमधील जुने आणि भलेमोठे लिंबाचे झाड मुळासकट उन्मळून गाड्यांवर पडले. झाड मोठे असल्याने त्याखाली दाबल्या गेलेल्या ८ ते १० चारचाकी गाड्यांचा चक्काचूर झाला आहे. दरम्यान, झाड कोसळताच मोठा आवाज झाल्याने परिसरात एकच घबराट पसरली. सुदैवाने, झाड पडले त्या क्षणी वाहनांमध्ये किंवा झाडाखाली कोणीही नागरिक उपस्थित नव्हते. त्यामुळे या घटनेत कोणतीही जीवितहानी वा दुखापत झालेली नाही. घटनेची माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापन पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

### लाखोंचा संशयित अन्नसाठा जप्त

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यात अन्न आणि औषध प्रशासनाने धडक कारवाई केली करत विविध ठिकाणी कारवाई करत लाखो रुपयांचा संशयित व प्रतिबंधित अन्नसाठा जप्त करण्यात आला. मालेगावच्या चंदनपुरी शिवारातील मेसर्स श्रीराम एंटरप्रायझेस येथून सुमारे १७ लाख २७ हजार रुपये किमतीचे सैल रिफाइंड सोयाबीन तेल जप्त करण्यात आले. तेलाचा दर्जा संशयास्पद असून रिपॅकर/उत्पादन परवाना, विक्री बिल नसणे व भेसळीचा संशय असल्याने ही कारवाई करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकारी प्रतिक भड व चेतन परदेशी यांनी कारवाई केली. कल्ली कुट्टी, मालेगाव येथील मेसर्स ए-वन ताज बेकरीमधून १ लाख ६० हजार रुपये किमतीचा सुमारे ४०० किलो टोस्ट जप्त करण्यात आला. परवान्याविना व्यवसाय तसेच अस्वच्छ परिस्थितीत उत्पादन होत असल्याचे आढळल्याने व्यवसाय बंदची नोटीस बजावण्यात आली.




# परभणीतील मुख्य रस्त्याच्या तीन तेरा तरी प्रशासनाला जाग येईना

## पाकिजा नगर ते रामजी आंबेडकर नगर मार्गाची दुरावस्था; नागरिक व व्यापाऱ्यांचा मनपा विरोधात संताप

हिंदू प्रकाश वार्ता/ अशोक पवार

**परभणी :** कुठल्या ना कुठल्या कारणाने परभणी प्रकाश झोतात येत असते व काहीनाकाही जुगाड परभणी मध्ये घडतेच असंच परभणी शहरातील नवा मोंढा परिसरातीलकृषी उत्पन्न बाजार समिती कडे जाणारा तसेच पाकीजा नगर रामजी आंबेडकर नगर जिंतूर रोड आणि गव्हाणे चौक यांना जोडणारा मुख्य रस्ता सर्वांचाच डोकेदुखी ठरला आहे.



सलग पडत असलेल्या पावसामुळे या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल झाला असून ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यामध्ये पाणी साठले आहे त्या मुळे वाहनचालकाला व रस्त्यावर पादचाऱ्यांना चालताना जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करावे लागते त्यामुळे पादचारी वर्गाची फार मोठी गैरसोय होत आहे. स्थानिक नागरिकाच्या म्हणण्यानुसार या रस्त्याचे गेल्या 10ते 12वर्षापासून पक्के रस्त्याची बांधणी करण्यात आलेली नाही प्रत्येक वेळेस माकडाच्या गोष्टी सारखे प्रशासनाला जाग येते व रस्त्या त्या थातूरमातूर डागडुजीला व आपल्या जवळच्या गुत्तेदाराला काम दिले जाते प्रत्येक पावसाळ्यात हीच परिस्थिती निर्माण होत आहे पक्का रस्ता बनण्याचे व कायमस्वरूपी रस्ता बनवण्याचे दुर्लक्ष होत आहे असा आरोप संतप्त नागरिकांतून केला जात आहे.

हा रस्ता जिल्हा परिषदे कडून कृषी उत्पन्न बाजार समितीकडे जाणारा शहरातील मुख्य मार्ग असल्याने अनेक ग्रामीण भागातील शेतकरी व्यापारी माल वाहू वाहने तसेच ट्रक ट्रॅक्टर चार चाकी हातगाड्या आणि बैलगाड्यांचा दिवसभर वर्दळ असते रस्त्यावर पडलेले मोठे मोठे खड्डे आणि चिखलामुळे वाहतुकीचा वेग मंदावून अपघाताचा मोठा धोका वाढला आहे नागरिकांचे व्यापाराचे असे म्हणणे आहे की खराब रस्त्यामुळे ग्राहकांना ये जा करण्यासाठीखुप मोठी अडचण निरमान होत असून या मुळे व्यापाऱ्याचा व्यवसायावर मोठा परिणाम होत आहे. परिसरातील रहिवासी्यांना या रस्त्याचा वापर करावा लागतो. मात्र पावसाल्यामुळे हा रस्ता पूर्णपणे चिखलमय झाल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे संबंधित लोकप्रतिनिधी आणि महानगरपालिका प्रशासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घ्यावी त्वरित पक्क्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करून किंवा डांबरीकरण करून कायमस्वरूपी रस्त्याचा तोडगा काढावा अशी मागणी व सर्वसामान्य नागरिकांनी केली आहे. शहरातील महत्वाच्या मार्गा पैकी एक असलेला या रस्त्याची एवढी दुरावस्था झाल्यानंतर महानगरपालिका प्रशासनाकडून कोणतीही रोज कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होत असून पावसाळा संपन्याची वाट न बघता तातडीने रस्त्याच्या दुरुस्तीचे काम हाती घ्यावे अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

# छत्रपती संभाजीनगर तहसील कार्यालयात राडा; अप्पर तहसीलदार उमेश पाटील यांना गावठी कट्ट्याने मारण्याची धमकी

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरच्या तहसील कार्यालयात एका बिल्डरने प्रचंड गोंधळ घालून अप्पर तहसीलदार उमेश पाटील यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केल्याची आणि गावठी कट्ट्याने ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी 'अमित डेव्हलपर्स'चा भागीदार अजितसिंग दौलतसिंग शिलेदारविरुद्ध सिटी चौक पोलीस ठाण्यात कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तहसील कार्यालयाच्या आवारात ही धक्कादायक घटना घडली. सहायक महसूल अधिकारी जितेंद्र जाधव यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, घटनेच्या दिवशी दुपारी अचानक तहसील कार्यालयात मोठ्याने आरडाओरड आणि अश्लील शिवीगाळ ऐकू आल्याने ते आपल्या दालनातून बाहेर आले. बाहेर येऊन पाहिल्यानंतर त्यांना समजले की, बिल्डर अजितसिंग शिलेदार कार्यालयात प्रचंड रोषात येऊन गोंधळ घालावत होता. "उमेश पाटील कुठे आहे? त्याच्या पीएला आताच्या आता येथे बोलवा, त्याला आता खल्लास करतो," अशा धमक्या देत तो अप्पर तहसीलदार उमेश पाटील यांच्या विरोधात अत्यंत अर्वाच्य आणि एकेरी भाषेत शिवीगाळ करत होता. आरोपी अजितसिंग शिलेदारने संताप व्यक्त करताना म्हटले की, महिनाभरापासून मी कार्यालयाच्या चकरा मारत आहे, पण तहसीलदार मला भेटत नाहीत आणि माझे कॉलही उचलत नाहीत. जर ते भेटत नसतील तर मला त्यांच्या घराचा पत्ता द्या, मी थेट त्यांच्या घरी जाऊन त्याला गावठी कट्ट्याने मारतो, अशी थेट जीवे मारण्याची धमकी त्याने दिली. विशेष म्हणजे, कार्यालयात इतर अधिकारी आणि महिला कर्मचारी उपस्थित असताना त्यांच्यासमोरच अजितसिंगने अत्यंत असभ्य भाषेत शिवीगाळ आणि अश्लील हावभाव केले. या प्रकारामुळे प्रचंड मानसिक धक्का बसून कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांना तिथेच रडू कोसळले, ज्यावरून कार्यालयात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या संपूर्ण प्रकारादरम्यान कार्यालयातील कर्मचारी रामदास मोगल, राजेश कवडे, गोविंद कवडे, प्रशांत जाधव, विजय सरोवर, शेखर शिंदे आणि साईनाथ बोंद्रे यांनी प्रसंगावधान राखून मध्यस्थी केली आणि अजितसिंगला शांत करण्याचा प्रयत्न केला. परंतु, तो शांत होण्याऐवजी अधिकच आक्रमक झाला आणि थेट या सर्व उपस्थित कर्मचाऱ्यांच्या अंगावर धावून गेला, ज्यामुळे कार्यालयात काही वेळ तणावाचे वातावरण होते. शासकीय कामात अडथळा निर्माण करणे, लोकसेवकाला जीवे मारण्याची धमकी देणे आणि महिला कर्मचाऱ्यांसमोर अश्लील वर्तन करत हुल्लडबाजी केल्याप्रकरणी अजितसिंग शिलेदारविरुद्ध सिटी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाचा पुढील सविस्तर तपास सिटी चौक पोलिसांकडून केला जात आहे.

# जटवाडा रोडवरील हितोपदेश हौसिंग सोसायटीत घरफोडी; 42 हजारांचा ऐवज लांबवला

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील जटवाडा रोडवरील हितोपदेश हौसिंग सोसायटीत घरफोडून चोरट्यांनी सोने-चांदीच्या दागिन्यांसह रोकड असा एकूण ४२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी हर्सूल पोलिसांनी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

राहुल लक्ष्मण ठोंबरे (वय ४०, रा. हितोपदेश हौसिंग सोसायटी, जटवाडा रोड) यांनी या प्रकरणी पोलिसात तक्रार दिली आहे. ठोंबरे हे सरकारी नोकरीत असून, ते सोमवारी (२० जुलै) सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास टाऊन हॉल, जयभीमनगर येथील सासरवाडीत पत्नी व मुलासह गेले होते आणि तिथेच थांबले होते. बुधवारी (२२ जुलै) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास त्यांच्या शेजारील महिलेने ठोंबरे यांच्या पत्नीला फोन करून घराचा दरवाजा उघडा असल्याची आणि वॉलकंपाउंडचे गेट बंद असल्याची माहिती दिली. यावरून ठोंबरे दामपत्याने तात्काळ घरी धाव घेतली. घरात प्रवेश केल्यानंतर त्यांना बेडरूममधील कपाट उघडे व त्यातील सामान व कपडे अस्ताव्यस्त पडलेले आढळले. चोरट्यांनी या घरफोडीत २१ हजार रुपयांची सोन्याची एकदाणी, २ हजार रुपयांची सोन्याची नथ, ६ हजार रुपयांच्या सोन्याच्या दोन अंगठ्या, ३ हजार रुपयांची चांदीची चेन, २ हजार रुपयांची कमरेची लहान चेन, ४ हजार रुपयांच्या चांदीच्या दंडोळ्या, २ हजार रुपयांचे ब्रासलेट आणि २ हजार रुपये रोख असा एकूण ४२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. घटनेची माहिती मिळताच हर्सूल पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असून, या प्रकरणाचा पुढील अधिक तपास पोलीस अंमलदार चंद्रशेखर इंगळे करत आहेत.

# छत्रपती संभाजीनगर येथे 10 कोटींच्या खर्चातून 'मराठी भाषा विकास केंद्र' उभारणार: उद्योग मंत्री उदय सामंत यांची घोषणा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि विकासासाठी शासन पुढाकार घेत असून, छत्रपती संभाजीनगर येथे हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने १० कोटी रुपये खर्चून 'मराठी भाषा विकास केंद्र' सुरू करण्यात येत असल्याची महत्त्वाची घोषणा राज्याचे उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज येथे केली. जिल्हाधिकारी कार्यालयात मराठी भाषा विभागाच्या वतीने आढावा बैठक व साहित्यिकांसमवेत संवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस आमदार विलास भुमरे, ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव आणि भाषा संचालनालयाचे संचालक अरुण गिते आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान साहित्यिक वि़रा. राठोड, गुलाबराव मगर आदी मान्यवरांनी आपले विचार मांडले. मान्यवरांचे विचार ऐकल्यानंतर बोलताना मंत्री उदय सामंत म्हणाले की, मराठी भाषेचा संस्कार हा घरातूनच व्हायला हवा. आपण लहान मुलांना मम्मी-पप्पा ऐवजी आई-बाबा म्हणायला शिकवायला हवे. शासनाच्या पातळीवर आता प्रत्येक जिल्ह्यात मराठी भाषा कार्यालय सुरू करण्यात येणार असून, जिल्हाधिकारी कार्यालयात हे कार्यालय असेल आणि त्यासाठी एक स्वतंत्र मराठी भाषा अधिकारी नेमला जाईल. तसेच हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने छत्रपती संभाजीनगर येथे सुरू होणाऱ्या मराठी भाषा विकास केंद्रासाठी १० कोटी रुपये खर्चण्यात येणार आहेत. यासोबतच पुस्तकांचे गाव, कवितांचे गाव असे उपक्रम साहित्यिकांच्या गावी राबवून त्यांच्या स्मृती जागविण्यात येतील. युवा साहित्य संमेलन, महिला साहित्य संमेलन आणि बाल साहित्य संमेलन अशा विविध संमेलन उपक्रमांनाही यादरम्यान चालना देण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बेहाडे यांनी केले.

# बायजीपुरा येथील 'येस फाईन बेकरी'वर कारवाई; अस्वच्छता आणि गंभीर अनियमिततेमुळे परवाना निलंबित

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या आस्थापनांवर अन्न सुरक्षा विभागाने कडक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. याचाच एक भाग म्हणून, राज्य शासनाच्या ' सेफ फूड सेफ महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत छत्रपती संभाजीनगरमधील बायजीपुरा परिसरातील 'येस फाईन बेकरी' वर अन्न सुरक्षा विभागाने धडक कारवाई केली असून, या बेकरीचा अन्न सुरक्षा परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला आहे.

नागरिकांच्या जीविताशी आणि आरोग्याशी थेट निगडित असलेल्या या प्रकरणात प्रशासनाने दाखवलेल्या कठोर भूमिकेमुळे अन्न सुरक्षा वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. अन्न सुरक्षा पथकाने बायजीपुरा येथील 'येस फाईन बेकरी'च्या उत्पादन आणि पॅकिंग विभागाची प्रत्यक्ष पाहणी केली असता, तेथील परिस्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे समोर आले. संपूर्ण उत्पादन परिसरात प्रचंड अस्वच्छता पसरलेली होती, ज्यामध्ये अन्नाची हाताळणी अत्यंत निकृष्ट दर्जाच्या वातावरणात होत असल्याचे स्पष्ट झाले. अन्न तयार करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या पाणी साठवण टाक्यांची नियमित स्वच्छता केली जात नव्हती. याशिवाय, बेकरीमध्ये कोणत्याही प्रकारची कीटकांपासून संरक्षणाची व्यवस्था (पेस्ट कंट्रोल) किंवा अन्न सुरक्षा व्यवस्थापन प्रणालीचा मागमूसही नव्हता. या धडक तपासणीदरम्यान पथकाला आणखी काही गंभीर बाबी आढळल्या.

बेकरीत उत्पादित होणाऱ्या पदार्थांवर ग्राहकांची दिशाभूल करणारी चुकीची माहिती छापली जात असल्याचे निर्दशनास आले. तसेच, अन्नपदार्थांवर उत्पादन किंवा पॅकिंगचा बॅच क्रमांक आणि कालबाह्यता दर्शवणारी तारीख यांचा पूर्णपणे अभाव होता, ज्यामुळे नेमके खाद्यान्न किती जुने आहे हे समजणे अशक्य होते. सर्वात संतापजनक बाब म्हणजे, अन्नपदार्थांची निर्मिती सुरू असताना उत्पादन क्षेत्रातच कामगार उघडपणे तंबाखूचे सेवन करत असल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आले, जे थेट अन्न सुरक्षा मानकांचे गंभीर उल्लंघन आहे.

या सर्व गंभीर अनियमितता आणि सार्वजनिक आरोग्याला निर्माण झालेल्या धोक्याचा गांभीर्याने विचार करून, अन्न सुरक्षा विभागाने तात्काळ प्रभावाने या बेकरीचा परवाना रद्द केला आहे.

नागरिकांच्या आरोग्याची आणि सुरक्षिततेची कोणतीही कुचराई खपवून घेतली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकारामुळे शहरात खाद्यपदार्थ तयार करणाऱ्या इतर अस्वच्छ आणि नियमबाह्य व्यावसायिकांचे धाबे दणाणले असून, अशा प्रकारच्या कठोर मोहिमांमुळे भविष्यात नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# सं पा द की य

## भक्तीचा अथांग सागर आणि पंढरपुरातील लोकसंस्कृतीचा महासोहळा

आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर विठुराया आणि माता रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूर नगरीत आलेला अलोट जनसागर हा महाराष्ट्राच्या अढळ धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेची साक्ष देणारा आहे. राज्यभरात झालेला उत्तम पाऊस, संतांच्या पालख्यांचे उत्साहात झालेले आगमन आणि १५ लाखांहून अधिक भाविकांची झालेली उपस्थिती यामुळे संपूर्ण पंढरपूर विठ्ठल नामाच्या गजराने दुमदुमून गेले आहे. यंदाच्या यात्रेसाठी किमान ३५ लाख भाविक येतील असा प्रशासकीय अंदाज प्रत्यक्षात येताना दिसत असून, वाळवंटात आणि चंद्रभागेच्या तीरावर भक्तीचा महापूर आल्याचे चित्र आहे. ही प्रचंड गर्दी केवळ धार्मिक श्रद्धेचा आविष्कार नसून, ती महाराष्ट्राच्या वारी परंपरेतील बंधुभाव आणि समतेच्या तत्त्वज्ञानाला दिलेली एक भक्कम पाठीराखण आहे. लाखोंच्या संख्येने आलेल्या वारकऱ्यांच्या व्यवस्थापनासाठी राज्य शासन आणि स्थानिक प्रशासनाने केलेली जय्यत तयारी कौतुकास्पद आहे. दर्शनरांगेचा विस्तार गोपाळपूर आणि स्वेरी कॉलेजच्याही पुढे गेल्याने अतिरिक्त पत्राशेड उभारणे, सुरक्षा व्यवस्था कडक करणे आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून लक्ष ठेवणे या गोष्टी अत्यंत वेळेवर आणि महत्त्वाच्या ठरल्या आहेत. भाविकांची राहण्याची सोय पूर्ण भरल्याने वारकरी मिळेल तिथे तंबू आणि राहुट्या उभारून राहत आहेत. हे पाहता, प्रशासकीय स्तरावर स्वच्छ पाणी, स्वच्छतागृहे आणि आरोग्य सेवा पुरवण्याचे आव्हान मोठे आहे; मात्र पोलीस दल, होमगार्ड आणि इतर सेवाभावी संस्थांच्या मदतीने हे गर्दीचे व्यवस्थापन सुरळीत राखण्याचा प्रयत्न केला जात आहे. आषाढी एकादशीची शासकीय महापूजा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मानाच्या वारकरी दांपत्यासह पहाटे पार पडणार आहे. या महासोहळ्याच्या निमित्ताने पंढरपुरात होणारी मोठी आर्थिक उलाढाल स्थानिक व्यापारी वर्गासाठी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला उभारी देण्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरत आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्यासह सर्व संतांच्या पालख्यांच्या आगमनाने निर्माण झालेली ही भक्तिमय ऊर्जा संपूर्ण महाराष्ट्राला एका सूत्रात बांधणारी आहे. पंढरपुरातील या शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणाचा मान राखत, प्रत्येक वारकऱ्याला सुलभ दर्शन आणि सुरक्षितता मिळावी हीच या पावन सोहळ्याच्या निमित्ताने ईश्वरचरणी प्रार्थना आहे.

## पंचतंत्र

पंचतंत्रातील गोष्टीचे आजचे महत्त्वः एकदा एक बैलगाडीचा बैल चुकून वनात राहून गेला. घरापेक्षा हा परदेश त्याला फारच भावला. तेथील मनमुक्त जीवन, भरपूर चारापाणी खाऊन चांगला तगडा झाला. अधून मधून खुरांनी नदीकाठची वाळवीची घर उकरणे, उध्वस्त करणे, वाळूत शिंग खुपसून इकडे तिकडे उधळणे आणि नंतर आपल्या खर्जातील जोरदार आवाजाने जंगल दणाणून सोडणे एवढाच उद्योग त्या बैलोबाला उरला.

त्याची ती भयंकर डरकाळी ऐकून तेथे पाणी पिण्यासाठी आलेला सिंहही हा कोण नवीन प्राणी ह्या जंगलात आला म्हणून विचार करून, घाबरून मागे सरकला. ज्याची डरकाळीच इतकी भीतीदायक, भेदक आहे तो नवीन प्राणी किती बलशाली असेल ह्याची कल्पनाच करवत नाही असे म्हणून मागे फिरताच त्याचा सच्चा मित्र पुढे आला आणि म्हणाला, काही वेळा झुरळं सुद्धा तुम्हाला घाबरविण्यासाठी उडत तुमच्या अंगावर येऊन बसतात. भीती दाखवतात. फक्त आवाजाने कशाला घाबरतोस!

तुटतो सेतु पाण्याने । मैत्री दुष्टपणामुळे
फुटे रहस्य धोक्याने । योग्य संरक्षिले न जे ।। 111.1 ।।

धैर्यास सोडता धूर्त । साहसी असुनी बरे
गंभीर घुमणाऱ्या त्या । आवाजानेही घाबरे ।। 111.2 ।।

शत्रू चालून येता तो । रौद्र क्रूर बलाढ्य ही
जो न डगमगे चित्ती । आपत्तीत भयंकरी ।। 112.1 ।।

तोंड देण्यास शत्रूसी । उभासे पाय रोवुनी
पराभव न चाखे तो । धैर्यधारीच जीवनी ।। 112.2 ।।
(वृत्त- आर्या)

दावी महा भयासी । प्रत्यक्ष जरी विधाता तोची
परि न धैर्य सोडे तो । धैर्यशील नर कधी जगती ।। 113.1 ।।

सकल आटती सरिता । ग्रीष्मातचि उन्हाने रणरणत्या
परि न आटतो सिंधू । रोज येतसे त्यास भरती ।। 113.2 ।।
(वृत्त- आर्या)

विषाद न आपत्तीत । धनाने न हर्ष, न रणी भीती
त्रिभुवन तिलका ऐशा । क्वचित जन्म देई जननी ।। 114 ।।

घाबरू नकोस एकदा वनात माणसा माणसांमधे लढाई झाली होती. त्या लढाईनंतर रणवाद्यांमधील एक भला मोठा नगारा तेथे तसाच राहून गेला. त्यावर झाडाच्या वाढलेल्या फांद्या वाऱ्याने आपटून मोठा आवाज होत असे. त्या आवाजाला घाबरून सर्व प्राणी पळून जात . एकदा एक कोल्हा तेथे त्याच्या जवळ गेला आणि त्याला कळून आलं की हा तर कोणी अजस्र प्राणी नाही.

पहिल्यांदाच पाहूनी । वाटलेचि असे जरा
रक्त मांस-परीपूर्ण । हे असेलचि सर्वथा ।। 117.1 ।।

पाहताच परी त्यासी । जरासे नीट आतुनी
दिसले फक्त लाकूड । चामडे झाकले वरी ।। 117.2 ।।

त्यामुळे मित्रांनो,
परदेशातील चारापाण्यावर पोसलेल्या बैलोबाच्या उदंड नारेबाजीला, त्याच्या धुमाकूळ घालण्याला न घाबरता आपणही त्याला तोंड देण्यास सज्ज झालं पाहिजे की नाही?

**- अरुंधती प्रवीण दीक्षित**

# दिल्ली प्रोटेस्ट : आंदोलनाचा आवाज दाबणार की प्रश्न सोडवणार?

## विद्यार्थ्यांचा आक्रोश, जंतर-मंतरवरील संघर्ष आणि शासनाच्या उत्तरदायित्वाची खरी वेळ











देशाच्या भवितव्याचा पाया जर शिक्षण असेल, तर त्या शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास हा राष्ट्राच्या प्रगतीचा आत्मा असतो. मात्र जेव्हा स्पर्धा परीक्षांच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते, कथित पेपरफुटी आणि गैरप्रकारांच्या बातम्या समोर येतात, तेव्हा केवळ एक परीक्षा संशयाच्या भोवऱ्यात सापडत नाही तर लाखो विद्यार्थ्यांची स्वप्ने, पालकांचा विश्वास आणि देशाच्या भविष्याची चिंता हादरते. दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेले सीजेपीचे आंदोलन याच अस्वस्थतेचे प्रतिबिंब म्हणून पाहिले जात आहे. विद्यार्थ्यांच्या मनातील प्रश्न सरळ आहे की मेहनत, गुणवत्ता आणि प्रामाणिकपणाला न्याय मिळणार आहे की पैशाच्या आणि गैरप्रकाराच्या शक्तीसमोर ते पुन्हा पराभूत होणार? या आंदोलनाला वेगळे नैतिक आणि सामाजिक परिमाण मिळाले ते सोनम वांगचुक यांच्या सहभागामुळे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना पाठिंबा देत त्यांनी उपोषण केले. प्रकृती खालावल्यानंतर त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले, तरी आंदोलनाचा आवाज थांबला नाही. त्यानंतर सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी उपोषणाची धुरा स्वीकारली. २० जुलै रोजी संसदेकडे 'चलो संसद' मोर्चाची हाक देण्यात आली आणि त्यानंतर दिल्लीतील आंदोलनाने राष्ट्रीय पातळीवर लक्ष वेधून घेतले. लोकशाहीत आंदोलन करणे हा संविधानिक अधिकार आहे. शासनाच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करणे म्हणजे राष्ट्रविरोध नव्हे. उलट, जनतेच्या प्रश्नांकडे सत्तेचे लक्ष वेधण्याचे आंदोलन हे लोकशाहीतील एक महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे प्रश्न असा आहे की, आंदोलनाचा आवाज दाबायचा की त्या आवाजामागील वेदना समजून घ्यायच्या?

२० जुलै रोजी जंतर-मंतर आणि संसद परिसराकडे जाणाऱ्या मार्गांवर मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. आंदोलक आणि सुरक्षा यंत्रणांमध्ये तणाव निर्माण झाला. पोलिसांनी अश्रुधुराचा वापर आणि लाठीचार्ज केल्याचे वृत्त आले, तर काही ठिकाणी आंदोलकांकडून दगडफेकीचे आरोपही झाले. या घटनांनंतर अनेक प्रश्न उपस्थित झाले. जर आंदोलकांनी कायदा मोडला असेल, तर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे पण पोलिसांकडूनही मर्यादा ओलांडल्या गेल्या असतील, तर त्याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. लोकशाहीत कायदा सर्वांसाठी समान असतो, आंदोलकांसाठीही आणि प्रशासनासाठीही. २० जुलैच्या घटनांनंतरही आंदोलन थांबले नाही. उलट, जंतर-मंतरवरील संघर्ष अधिक तीव्र झाला. २२ जुलैला आंदोलनस्थळ पुन्हा सक्रिय झाल्याचे वृत्त आले आणि २३ जुलैपर्यंतही सीजेपी आंदोलन सुरूच आहे. दरम्यान केंद्र सरकारने चर्चेची तयारी दर्शविल्याचे वृत्त आहे, मात्र आंदोलकांनी सरकारच्या प्रतिसादाला अपुरे मानत केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी कायम ठेवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेपरफुटी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची भूमिका व्यक्त केली असली, तरी आंदोलकांचा प्रश्न केवळ दोषींना शिक्षा देण्यापुरता मर्यादित नाही; त्यांना उत्तरदायित्व, पारदर्शकता आणि भविष्यातील परीक्षांची विश्वासार्हता याची हमी हवी आहे.

आज विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास हा या संपूर्ण प्रकरणातील सर्वात मोठा धोका आहे. स्पर्धा परीक्षा म्हणजे गुणवत्तेची कसोटी न राहता पैशांची आणि संपर्कांची स्पर्धा झाली, अशी भावना तरुणांच्या मनात निर्माण झाली तर त्याचे परिणाम अत्यंत गंभीर असतील. एका विद्यार्थ्याचे वर्ष वाया जाणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचे नुकसान नाही, त्यामागे एका कुटुंबाची आर्थिक गुंतवणूक, पालकांची स्वप्ने आणि विद्यार्थ्याची मानसिक झुंज असते. उद्याचे डॉक्टर, अभियंते, वैज्ञानिक, प्रशासकीय अधिकारी, न्यायाधीश आणि लोकप्रतिनिधी आजच्या वर्गखोल्यांमध्ये घडत आहेत. त्यामुळे त्यांच्या मनातील विश्वास तुटणे म्हणजे देशाच्या भविष्याच्या पायाभरणीतच तडे जाणे होय. या आंदोलनाला विविध राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि सार्वजनिक क्षेत्रातील व्यक्तींकडून पाठिंबा मिळत असल्याचे वृत्त आहे. मात्र आंदोलनाला राजकीय पाठिंबा मिळाला म्हणून त्यातील मूळ प्रश्न गौण ठरत नाही. उलट, सत्ताधारी आणि विरोधकांनी राजकीय आरोप-प्रत्यारोप बाजूला ठेवून विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर हाताळला पाहिजे. हा प्रश्न कोणत्याही एका पक्षाचा नसून, प्रत्येक पालकाचा आणि प्रत्येक विद्यार्थ्याचा आहे.

मात्र या संपूर्ण प्रकरणात एक महत्त्वाची सावधगिरी आवश्यक आहे. कोणत्याही तपासाआधी कोणालाही दोषी ठरविणे योग्य नाही. पेपरफुटी किंवा गैरप्रकाराच्या आरोपांची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर परीक्षेची प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते वितरण, परीक्षा केंद्र आणि निकालापर्यंतची संपूर्ण व्यवस्था अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाचा वापर, स्वतंत्र देखरेख यंत्रणा आणि विद्यार्थ्यांशी थेट संवाद या उपाययोजना तातडीने करण्याची आवश्यकता आहे. दरम्यान, २३ जुलैच्या घडामोडींमध्ये आणखी एक महत्त्वाचा मुद्दा पुढे आला आहे. दिल्ली पोलिसांनी राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत अधिकार विस्ताराचा आदेश सीजेपी आंदोलनाशी संबंधित नसून नियमित प्रशासकीय नूतनीकरण असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे अशा संवेदनशील काळात सोशल मीडिया पोस्ट किंवा अपुष्ट दाव्यांपेक्षा अधिकृत माहिती आणि तथ्यांवर विश्वास ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. आंदोलनाच्या नावाखाली हिंसा करणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे; पण शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आवाजही ऐकला गेला पाहिजे.

आज आणखी एक गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे की, सरकार आणि आंदोलक यांच्यातील संवादाची दारे खरोखर उघडी आहेत का? सरकार चर्चेची तयारी दर्शवत असेल तर ती चर्चा प्रत्यक्षात झाली पाहिजे. आंदोलकांनीही संवादाची संधी नाकारता कामा नये. कारण लोकशाहीतील कोणताही संघर्ष शेवटी संवादाच्या टेबलावरच संपतो. रस्त्यावरचा संघर्ष जितका लांबतो, तितकी समाजातील अस्वस्थता वाढते. २० जुलैच्या घटनांनी देशासमोर एक मूलभूत प्रश्न उभा केला आहे, विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तर पोलिसी बळाने मिळणार की संवादाने? आंदोलनकर्त्यांनी कायदा हातात घेऊ नये, हे जितके खरे आहे, तितकेच प्रशासनानेही संयम राखून कायद्याच्या चौकटीत वागणे आवश्यक आहे. सरकारची ताकद विरोध दडपण्यात नसते; तर विरोध ऐकून त्यावर योग्य उत्तर देण्यात असते.

आज २३ जुलैला दिल्लीतील आंदोलन एका निर्णायक वळणावर आहे. एका बाजूला सरकारकडून चर्चेची तयारी, दुसऱ्या बाजूला आंदोलकांच्या मागण्यांवरील ठाम भूमिका आणि तिसऱ्या बाजूला वाढता राजकीय हस्तक्षेप. या तिन्हींच्या छेदनबिंदूवर विद्यार्थ्यांचे भविष्य उभे आहे. दिल्ली उच्च न्यायालयात आंदोलनासंदर्भातील याचिकेवर सुनावणी होणार असल्याचेही वृत्त आहे. त्यामुळे आता या संघर्षाला कायदेशीर आणि लोकशाही मार्गाने तोडगा काढण्याची जबाबदारी सर्व संबंधित घटकांवर आहे. या आंदोलनाचा शेवट कोणाच्या विजयाने किंवा पराभवाने होऊ नये, विजय झाला पाहिजे तो विद्यार्थ्यांच्या विश्वासाचा. प्रश्नपत्रिका फुटली की केवळ एक परीक्षा भ्रष्ट होत नाही, तर समान संधीचा घटनात्मक अधिकार जखमी होतो. एका विद्यार्थ्याची मेहनत जर पैशाच्या आणि गैरप्रकाराच्या शक्तीसमोर हरली, तर त्याचा पराभव केवळ त्या विद्यार्थ्याचा नसतो. तो संपूर्ण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा पराभव असतो. म्हणून प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रत्येक आरोपाची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे, दोषी कोणीही असो त्याच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे आणि भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, यासाठी अभेद्य, पारदर्शक आणि विश्वासार्ह परीक्षा व्यवस्था उभी केली पाहिजे.

देशाला आंदोलनाची आग नको, तर न्यायाचा प्रकाश हवा आहे. विद्यार्थ्यांना संघर्ष नको तर विश्वास हवा आहे. सरकारला विरोध नको असेल, तर जनतेचे प्रश्न ऐकावे लागतील आणि विद्यार्थ्यांना पुन्हा रस्त्यावर उतरावे लागू नये असे वाटत असेल, तर त्यांच्या भविष्याची हमी घोषणांमधून नव्हे, तर कृतीतून द्यावी लागेल. कारण राष्ट्राची खरी उभारणी केवळ संसद भवनाच्या भिंतींवर होत नाही तर ती उभी राहते विद्यार्थ्यांच्या डोळ्यातील स्वप्नांवर, पालकांच्या विश्वासावर आणि गुणवत्तेला मिळणाऱ्या न्यायावर. आता वेळ आहे आंदोलनाचा आवाज दाबण्याची नव्हे, तर तो ऐकण्याची आश्वासन देण्याची नव्हे, तर उत्तरदायित्व स्वीकारण्याची आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, देशाच्या भावी पिढीच्या भविष्याला न्याय देण्याची!

**- प्रवीण बागडे, नागपूर**
**मो. क्र. ९९२३६२०९१९**

# विठ्ठल सर्वांना सामावून घेतो; घुसखोरी कशासाठी?

कित्तेक शतकांपासून पंढरपूरची वारी चालू आहे. ह्या वारीत ज्ञानोबा, तुकोबाराय, संतसेना, संत सावता माळी, संत एकनाथ, संत चोखोबाराय, संत नरहरी सोनार, संत मुक्ताबाई, संत जनाबाई, संत नरसी मेहता, संत गोरोबा कुंभार विविध जातीपंथाचे संत आणि परंपरा वारीला जात असतात. कित्तेक वर्षात वारीत ना कोणाला कोणाचा विटाळ झाला. ना कुणी कुणाला तुच्छ लेखलं. संतांना तुच्छ लेखणारे नंतर त्याच संतांच्या पायावर लोटांगण घालत गेले. इतकचं नाही तर संत हे देवांच्याच योग्यतेचे आहेत असं त्यांचाच कधीकाळी छळ करणारे म्हणून गेले. म्हणे रामेश्वर भट्ट द्विजा, तुका विष्णू नाही दुजा|| तुकोबाराय हे साक्षात् पंढरीनाथ आहेत असंच म्हणाले. आमच्या संतांनी अगोदरच समतेची, समरसतेची शिकवण दिलेली आहे. हीच शिकवण आमचा वारकरी आचरणात आणतो आहे. पण आज वारीत जी घुसखोरी झाली आहे त्यापासून खरं तर सावधान होण्याची वेळ आली आहे. आज वारीत विद्वान, उच्चशिक्षित लोकांना सोबत घेऊन आपला डावा अजेंडा घेऊन चालणारी मंडळी. (अर्बन नक्षली), राजकीय फायद्यासाठी राष्ट्र हिताला बाजूला ठेऊन काहीही करणारे खोटे पुढारी, जातीय तेढ निर्माण करणारे तथाकथित पुरोगामित्वाचा खोटा झेंडा राबवणारे जहाल कम्युनिस्ट घुसले आहेत. ज्यांना ना देवाशी, ना धर्माशी, ना राष्ट्रांशी देणे घेणे आहे. त्यांना ह्या वारीतून स्वतःचा अजेंडा राबविण्यासाठी दलाली करायची आहे आणि एक कंपू जो भारताच्या पोटातून कार्यवाही करतो आहे त्यांना बळ द्यायचं आहे. पण हे आमचे वारकरी केंव्हाच ह्याच्यात फसणार नाहीत. कारण वारकरी मंडळींना आमच्या संत समूहाची शिकवण माहिती आहे. आमच्या संतांनी कधीही जात, वर्ण, पंथ, मानला नाही. सर्वांनी खुल्या मनाने सर्वांचे स्वागत केले आहे.

उच्च नीच काही नेनों भगवंत, तिष्ठे भाव भक्ती देखिनिया|| हा विचार आमच्या संतांनी शेकडो वर्षापूर्वी दिलाय. संविधानाच्या प्रती घेऊन वारीत समता सांगणाऱ्यांनी हे लक्षात ठेवलं पाहिजे की समानता ही संतांनी केंव्हाच सांगितली आहे. नाही वर्ण, पंथ याती, नामी अवघेची तरती|| आमच्याकडे ना वर्ण आहे, ना जात आहे, ना पंथ आहे, जो जो म्हणून पंढरीच्या पांडुरंगच्या चरणावर मस्तक ठेवेल आणि नाम मुखात घेईल त्यांना हा समानतेचा भाव शेकडो वर्षापासून माहिती आहे. आज संविधानाच्या प्रती आणि वारीत संविधान शिकवणाऱ्यांचा हेतू आम्ही लक्षात घेतला पाहिजे. ज्याला स्वतःला राष्ट्र ही संकल्पना मान्य नाही अशी माणसं सध्या वारीत संविधान सांगताहेत, वारी दूषित करण्याचा त्यांचा प्रामाणिक हेतू आहे. तो हेतू तुम्ही आम्ही कोणीही सिद्ध होऊ देणार नाही हे लक्षात त्यांच्या आल्यावर त्यांनी ज्यांना देव मान्य नाही अशी माओवादी, पाद्री, भगत मंडळी आता वारीत घुसवायला सुरुवात केली आहे. ज्यांना संत ज्ञानेश्वर मान्य नाहीत, संत एकनाथ मान्य नाहीत अशी थोरल्यांची ब्रिगेड वारीत घुसून वारकऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्यांना देव मान्य नाही अशांना आमचे नामदेवराय सांगतात, शिंपियाचे कुळी जन्म माझा झाला, तरी गुंतला सदाशिवि|| मी जातीने कुणीही असलो तरी मी परमेश्वर भक्तीत गुंतल्याच नामदेवराय सांगतात. तरी स्वतः देव न मानणारी मंडळी सांगतेय वारकऱ्यांना, त्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. ह्यांच्या लक्षात आलं आता समाजात फूट पडत नाही तेंव्हा ह्यांनी सामान्य ईश्वरभक्ती असलेल्या वारकरी मंडळीत हा अजेंडा राबवायला सुरू केला आहे. पण ह्यांना काय माहीत की वारकरी विष्णुदास आहेत आणि ते मऊ मेनाहून आहेत, आणि प्रसंगी वज्राहून कठीण आहेत. आता काही वारकरी मंडळींच्या हा ह्यांचा विकृत अजेंडा लक्षात आल्यावर त्यांना बदनाम करण्याचा देखील प्रयत्न त्यांच्या विचारांच्या मीडियाची केल्याचा घृणीत प्रकार आपल्या सुरुवातीच्या काही दिवसात लक्षात आला आहे...

आपला विचार वारीत घुसवला म्हणजे समाज बदनाम करता येतो, हे त्यांनी हेरले आहे पण वारकरी हा परंपरेचा सहिष्णू आहे. मुळात वारकरी पिंड हा समानता आणि समरसता मानतो आहे. विठ्ठल आगोदर पासूनच सर्वांना सामावून घेतो. विठ्ठला जवळ आणि इथे पंढरीच्या वारीत कोणताही भेद न पाळता सर्वजण एकमेकांच्या चरणावर मस्तक ठेवतात. तुकोबांचा हा शीर्षकाचा अभंग पूर्ण अभ्यासला की लक्षात येत की वारकऱ्यांना काहीही सांगायची गरज नाही, वारकरी मंडळी हे पूर्वापार संताच्या शिकवणीतून आचरणात आणत आहेत. स्त्री, पुरुष, इतकचं काय चांडाळ, अगदीच कोणीच नीच नाही असंही आमच्या संतांनी केंव्हाच सांगितला आहे.

शुद्ध याति कुळ अथवा चांडाळ ।
स्त्री अथवा बाळ हो कां नीच॥
एका जनार्दनीं नाहीं यातीचें कारण
। वाचे उच्चारण तोचि शुचि॥

समानतेची अशी हजारो प्रमाण आमच्या संताची दिलीली आहेत, इतकं समानता आणि समता व समरसता आमच्या संत परंपरेने सांगितली आहे. तरीही कम्युनिस्ट मंडळींचा, डाव्यांचा, मावोवादी लोकांचा वारीतील हा कुटील डाव आपण ओळखला पाहिजे. सरते शेवटी मला तुकोबाराय ह्यांचा एक अभंग ह्या ठिकाणी द्यावासा वाटतोय, किमान ह्या अभंगाचा अर्थ ही मंडळी समजून घेईल आणि आमची सामाजिक सुचीतेची वारी ही मंडळी आपल्या कुटील कारस्थानांने दूषित करणार नाही अशी आशा बाळगू...

वर्णअभिमानें कोण झाले पावन।
ऐसें द्या सांगून मजपाशीं ॥१॥

अंत्यजादि योनि तरल्या हरीभजनें ।
तयाचीं पुराणें भाट झालीं ॥२॥

वैश्य तुळाधार गोरा तो कुंभार ।
धागा हा चांभार रोहिदास ॥३॥

चोखामेळा बंका जातीचा महार ।
त्यासी सर्वेश्वर ऐक्य करी ॥४॥

नामयाची जनी कोण तिचा भाव ।
जेवी पंढरीराव तियेसवें ॥५॥

मैराळ जनक कोण कुळ त्याचें ।
महिमान तयाचें काय सांगों ॥६॥

यातायातीधर्म नाहीं विष्णुदासा ।
निर्णय हा ऐसा वेदशास्त्रीं ॥७॥

तुका म्हणे तुम्ही विचारावे ग्रंथ ।
तारिले पतित नेणों किती ॥८||

वारीच्या माध्यमातून समाज जोडायला आमच्या संतांनी शिकवलं आहे, कर्म प्रधान हेंही आमच्या संतांनी केंव्हाच शिकवलं आहे. देवाला कोणाचाही विटाळ झाला नाही, होत नाही आणि आमची वारकरी मंडळी देखील कधीच कोणाचा विटाळ पाळत नाही. परमेश्वराला नितांत श्रद्धा असलेला असलेला आमचा हा वारीतील समाज वैष्णवांच्या मेळ्यात एकमेकांच्या गळ्यात गळा घालून विठ्ठलाला एकच मागणी मागतो. प्रत्येक वारकरी वयक्तिक पायी कित्तेक मैलाची वारी करतो. तो स्वतःसाठी, स्वतःच्या परिवारासाठी काहीही मागत नाही तो मागणी कोणती असते, हा माझा मानवी समाज, माझं राष्ट्र, वैभव संपन्न झालं पाहिजे. इतकी समज असलेला आमचा वारकरी ह्या लोकांच्या विकृत प्रचाराला नक्की बळी पडणार नाही ही खात्री आहे...

**- विशाल वसंतराव मुळे आजेगावकर...**

# जिंतूर येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद
## प्रत्येक नागरिकांपर्यंत कल्याणकारी योजनांचा लाभ पाहोचविण्यास शासन कटीबध्द : मेघना साकोरे-बोर्डीकर







हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**परभणी:-** शासनाच्या लोककल्याणकारी योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत थेट, सुलभ आणि प्रभावीपणे पोहोचविणारे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान' हे शासनाचे लोकाभिमुख पाऊल आहे. या अभियानाच्या माध्यमातून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत योजनांचा लाभ पोहोचत असून प्रत्येक नागरिकाच्या समस्या सोडवून त्यांचे समाधान साधले जात आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त जिंतूर येथील परभणी रोडवरील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात आज समाधान शिबीर संपन्न झाले. या शिबीराचे उदघाटन पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा लता वाकळे, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिंतूरचे नगराध्यक्ष प्रताप देशमुख, पंचायत समिती सभापती अयोध्या खिस्ते, उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, तहसिलदार शिवाजी मगर, शीतल कच्छवे, सहायक निबंधक बी.एस. नांदापूरकर आदींसह सर्व विभागप्रमुख, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, अंगणवाडी सेविका, आशाताई आणि मोठ्या संख्येने नागरिक व लाभार्थी उपस्थित होते.

शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणे, महसूल व इतर शासकीय विभागांच्या सेवा सुलभ करणे आणि नागरिकांच्या प्रलंबित प्रश्नांचे तत्काळ निराकरण करणे, हा या शिबिराचा प्रमुख उद्देश होता. शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यानंतर दीपप्रज्वलनाने शिबीराचे उदघाटन झाले.

पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान' राबविण्यात येत आहे. परभणी जिल्ह्यातील सर्व महसूल मंडळात हे अभियान उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीपणे पार पडले आहे. या अभियानाचा एकच उद्देश आहे, शासनाच्या कोणत्याही योजनेपासून एकही पात्र नागरिक वंचित राहता कामा नये.

आज शासन स्वतः नागरिकांच्या दारी जाऊन सेवा देत आहे. महिलांना आत्मनिर्भर आणि सक्षम बनविण्यासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. एकल महिलांच्या सन्मानपूर्ण आणि सुरक्षित जीवनासाठी स्वतंत्र एकल महिला धोरण तयार करण्यात येत असून, त्यांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी शासन कटिबद्ध आहे.

शेतकऱ्यांसाठी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना' राबविण्यात येत आहे. यासह अनेक लोकहिताच्या योजना सुरू करण्यात आल्या आहेत. प्रशासनाने अधिक संवेदनशील, गतिमान आणि लोकाभिमुख पद्धतीने काम करत प्रत्येक गावात, प्रत्येक कुटुंबापर्यंत शासनाच्या योजनांचा लाभ पोहोचवावा. नागरिकांनीही पुढाकार घेऊन या योजनांचा लाभ घ्यावा, अस आवाहन पालकमंत्री यांनी केले.

दरम्यान, पालकमंत्री यांनी आपल्या भाषणा दरम्यान लाभार्थ्यांशी थेट संवाद साधला. शासनाकडून मिळालेल्या लाभामुळे जीवनात झालेल्या परिवर्तनाबद्दल लाभार्थ्यांनी यावेळी माहिती दिली. शासनाच्या लोकाभिमुख उपक्रमांचे लाभार्थ्यांनी कौतुक केले.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण आपल्या मनोगतात म्हणाले की, "शासनाच्या प्रत्येक लोककल्याणकारी योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविणे, ही प्रशासनाची प्राथमिकता आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियान' हे त्या उद्देशानेच प्रामुख्याने राबविण्यात येत आहे. शासनाच्या सेवा अधिक पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख करण्यासाठी हे अभियान प्रभावी माध्यम ठरत आहे.

या अभियानातून जिल्ह्यात अनेक महत्त्वाची विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. वर्षानुवर्षे अतिक्रमणामुळे बंद झालेले पाणंद रस्ते मोकळे करण्यात आले असून, आता या रस्त्यांचे मजबुतीकरण करून शेतकऱ्यांना बारमाही दळणवळणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. या विकासकामांना यश मिळण्यासाठी ग्रामस्थांचा सहभाग आणि सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रशासन आणि नागरिकांनी एकत्रितपणे काम केल्यास गावांचा विकास अधिक वेगाने होईल.

महिलांचे सक्षमीकरण हा राज्य शासनाच्या विकास धोरणाचा केंद्रबिंदू आहे. महिला आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या सक्षम झाल्या तर कुटुंब, समाज आणि देशाची प्रगती अधिक वेगाने होते. त्यामुळे महिलांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. तसेच प्रत्येक कुटुंबाने महिलांना मालमत्तेतील समान हक्क देत त्यांच्या नावाची वारसा नोंद आणि सातबाऱ्यावर नोंद करण्यासाठी पुढाकार घ्यावा.

समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी बालविवाहासारख्या अनिष्ट प्रथांना पूर्णविराम देणे आवश्यक आहे. मुलींना लहान वयात विवाह न लावता त्यांना उच्च शिक्षण, कौशल्य विकास आणि स्वावलंबनाची संधी द्यावी. शिक्षित आणि आत्मनिर्भर मुलगी हेच कुटुंबाचे, समाजाचे आणि राष्ट्राचे खरे सामर्थ्य आहे. या अभियानाच्या माध्यमातून शासन आणि प्रशासन आपल्या दारी आले आहे; त्यामुळे नागरिकांनीही पुढाकार घेऊन शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा.

यावेळी नगराध्यक्ष प्रताप देशमुख यांनी नगर पालिकेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या विकासकामांची माहिती दिली. तर उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान अभियानाबद्दल माहिती दिली.

प्रास्ताविक तहसिलदार शीतल कच्छवे यांनी केले. यावेळी विविध विभागाच्या लोककल्याणकारी योजनांतील लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात लाभांचे वितरण करण्यात आले. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणारे बीएलओ यांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रारंभी शालेय विद्यार्थीनींनी स्वागत गीत गायले. शिक्षक संतोष कांबळे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची महती सांगणारा पोवाडा सादर केला.

कार्यक्रमानंतर नागरिकांच्या माहितीसाठी उभारण्यात आलेल्या विविध विभागांच्या स्टॉल प्रदर्शनाचे पालकमंत्री यांच्या हस्ते फित कापून उदघाटन करण्यात आले.

## पाथरीत युवक काँग्रेसचा धडक मोर्चा : केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी; तहसीलदारांना निवेदन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :-** देशभरात नीट परीक्षेशी संबंधित तणावामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटनांमध्ये वाढ झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, या मागणीसाठी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांच्या नेतृत्वात पाथरी शहर युवक काँग्रेसच्या वतीने शुक्रवार 24 जुलै रोजी धडक मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

नीट परीक्षेच्या पार्श्वभूमीवर देशभरात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या घटना घडत असून त्यामुळे शिक्षण व्यवस्थेबाबत संतापाची लाट निर्माण झाली आहे. या घटनांच्या निषेधार्थ नवी दिल्ली येथील जंतर-मंतर येथे विद्यार्थी संघटना, सामाजिक संस्था व विविध राजकीय पक्ष आंदोलन करत आहेत. त्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी पाथरी शहर युवक काँग्रेसच्या वतीनेही मोर्चा काढण्यात येणार आहे. शुक्रवारी दुपारी 2 वाजता चौक बाजार, पाथरी येथून तहसील कार्यालयापर्यंत मोर्चा काढून तहसीलदारांमार्फत केंद्र सरकारला निवेदन पाठविण्यात आले. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र



प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींवर कोणत्याही प्रकारचा लाठीचार्ज किंवा अश्रुधुराचा वापर करू नये तसेच आंदोलकांवर गुन्हे दाखल करू नयेत, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

दरम्यान, या आंदोलनात शहराध्यक्ष अमोल जाधव, पाथरी शहराध्यक्ष दादाराव गवारे, आरिफ दुर्राणी, पठाण अदनान, सोहेल पठाण, सोहेल अन्सारी, तौसिफ शेख, शेख नविद, शेख अशफाख, ए.बी. राजे, शेख इरफान, अमिर खान, रैफ बसरी, राणा पठाण, शेख वाजेद, विलास कांबळे, इब्राहीम अन्सारी, वैजनाथ महिपाल, अशोक कदम, अमोल लांडगे, अबरार शेख, चंद्रकांत हिवाळे, हमीद खान, हसीब शेख, मिलींद आठवे,परवेज बेग, सय्यद शाहेद, शेख अफसर, अमन शेख, सय्यद अर्श, मुद्दसीर, अन्सारी मुस्तकीम यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' जिल्हास्तरीय स्पर्धांसाठी युवकांना सहभागाचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**परभणी :** युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत माय भारत, यांच्या वतीने जिल्ह्यात 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत असून, या अभियानांतर्गत जिल्हास्तरावर विविध सांस्कृतिक, साहित्यिक व सर्जनशील स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील युवक-युवतींमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करणे, सृजनशीलतेला प्रोत्साहन देणे तसेच विकसित भारताच्या संकल्पनेत युवकांचा सक्रिय सहभाग वाढविणे हा या स्पर्धांचा मुख्य उद्देश आहे.

या अभियानांतर्गत संगीत (लोकगीत सामूहिक), एकांकिका/मूकनाट्य (सामूहिक), नृत्य (सामूहिक), चित्रकला स्पर्धा (वैयक्तिक), वक्तृत्व/वादविवाद स्पर्धा (वैयक्तिक), लघुपट/शॉर्ट फिल्म स्पर्धा (वैयक्तिक), घोषवाक्य लेखन स्पर्धा (वैयक्तिक) तसेच स्लॅम पोएट्री/मौखिक कविता स्पर्धा (वैयक्तिक) अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे.

सर्व स्पर्धांचा विषय 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' या अभियानाशी संबंधित असून, व्यसनमुक्ती, निरोगी जीवनशैली, सामाजिक जबाबदारी आणि विकसित भारत निर्मितीत युवकांची भूमिका या विषयांवर आधारित सादरीकरणे अपेक्षित आहेत.

जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था तसेच १५ ते २९ वयोगटातील सर्व युवक-युवतींनी या स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन अभियान यशस्वी करावे, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी, माय भारत, परभणी प्रणित सांगवीकर यांनी केले आहे.

स्पर्धा दि. २८ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता श्री शिवाजी महाविद्यालय, येथे आयोजित करण्यात येणार आहेत.

अधिक माहितीसाठी जिल्हा युवा अधिकारी, माय भारत, यांच्याशी ९८२३२२२५२९ / ९९७५९५१५१० या भ्रमणध्वनी क्रमांकावर किंवा mybharatparbhani@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा युवा अधिकारी यांनी केले आहे.

## बदाम गल्ली, किराडपुरा येथे 'आपले शहर – आपली जबाबदारी' जनजागृती अभियान सर्व पक्षीय मुस्लिम आघाडी व नशा मुक्त अभियानच्या वतीने




**छत्रपती संभाजीनगर :** शहर स्वच्छ, सुंदर, हरित आणि निरोगी ठेवणे ही केवळ प्रशासनाची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. याच सामाजिक जाणीवेतून 'आपले शहर – आपली जबाबदारी' या जनजागृती अभियानाचे आयोजन गुरुवार, २३ जुलै २०२६ रोजी दुपारी १२ वाजता बदाम गल्ली, किराडपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले. सर्वपक्षीय मुस्लिम आघाडी व नशामुक्ती अभियानाचे संस्थापक अध्यक्ष साजीद मौलाना यांच्या नेतृत्वाखाली या महत्त्वपूर्ण जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले. नागरिकांमध्ये स्वच्छता, नागरी शिस्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी हे अभियान राबविण्यात आले.

*यावेळी बोलताना साजीद मौलाना यांनी सांगितले की, शहराचा विकास केवळ रस्ते, इमारती आणि शासकीय योजनांमुळे होत नाही, तर नागरिकांच्या सक्रिय सहभागातून शहराचा खरा विकास साध्य होतो. प्रत्येक नागरिकाने आपल्या शहराप्रती असलेली जबाबदारी ओळखून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, पाणी व वीज बचत आणि नागरी शिस्तीचे पालन करणे गरजेचे आहे. याच उद्देशाने या अभियानातून नागरिकांना स्वच्छतेबरोबरच विविध सामाजिक आणि नागरी जबाबदाऱ्यांबाबत जनजागृती करण्यात आली. अभियानादरम्यान कचरा घंटागाडीतच टाकणे, ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे, पाणी व वीज बचत करणे, घरपट्टी व पाणीपट्टी वेळेवर भरणे, तसेच गुंठेवारी अंतर्गत अवैध बांधकामे नियमित करण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. 'पाणी वाचवा – भविष्य वाचवा', 'वीज वाचवा – देश वाचवा', 'कर भरा – शहर संवारा' आणि 'कचरा घंटागाडीतच टाका' अशा प्रभावी संदेशांच्या माध्यमातून नागरिकांना शहराच्या विकासात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले. या अभियानातून नागरिकांनी केवळ समस्या मांडण्याऐवजी शहराच्या विकासासाठी आपली जबाबदारी स्वीकारावी, स्वच्छता राखावी, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असा संदेश देण्यात आला.

या जनजागृती अभियानात राधाकिशन पंडित (महासचिव, नशामुक्ती अभियान), खालेद नाहदी, सलीम शाह, शेख सलीम सर (महासचिव, सर्वपक्षीय मुस्लिम आघाडी), धीरज पवार, बने खाँ पठाण (उपाध्यक्ष, सर्वपक्षीय मुस्लिम आघाडी), फारूक खान, अशोक खोसरे पाटील, राहुल शिरसाठ, हफीज अली, शेख अब्दुल रईस, अब्दुल कय्यूम (कोषाध्यक्ष), अशरफ पठाण, युसूफ खान, भीमसेन कांबळे, खिजर सिद्दीकी, श्रीमती दिशा आकाश सुरवसे पाटील, डॉ. शेख शकील, शेख मुकरम, शेख मोहसीन सर, भिकन भाई आणि किशोर म्हस्के यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले.

## एसआयआर अभियानात गंगाखेड उपविभागाची उल्लेखनीय कामगिरी;
## उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) अभियानांतर्गत गणना प्रपत्रांच्या संगणकीकरणामध्ये परभणी जिल्ह्याने उल्लेखनीय प्रगती साधली असून, दि. २४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत जिल्ह्यात १२,३१,०५८ गणना प्रपत्रांचे (७९.८९ टक्के) संगणकीकरण पूर्ण करण्यात आले आहे. या अभियानात गंगाखेड विधानसभा मतदारसंघाने ३,५९,३४४ गणना प्रपत्रांचे (८६.०७ टक्के) संगणकीकरण करून जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.




या उल्लेखनीय कामगिरीत गंगाखेडचे उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली उत्कृष्ट नियोजन व सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे गंगाखेड उपविभागाने जिल्ह्यात अव्वल स्थान मिळविले. या कामगिरीमुळे राज्यस्तरावरही गंगाखेड उपविभागाने नववा क्रमांक प्राप्त करून परभणी जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे.

या यशाबद्दल जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी संजयसिंहजी चव्हाण यांच्या हस्ते जीवराज डापकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार, उपविभागीय अधिकारी (परभणी) उदयसिंहजी भोसले, उपविभागीय अधिकारी (पाथरी) संगीता चव्हाण, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी आणि निवडणूक शाखेतील कर्मचारी उपस्थित होते. सत्कारप्रसंगी जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी श्री जीवराज डापकर तसेच त्यांच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन करत, उर्वरित कामकाजही याच गुणवत्तेने, वेगाने आणि अचूकतेने पूर्ण करण्याचे आवाहन केले. त्यांनी सर्व विधानसभा मतदारसंघांनी गंगाखेडच्या कार्यपद्धतीचा आदर्श घेऊन विशेष सखोल पुनरीक्षण अभियान यशस्वी करण्यासाठी समन्वयाने काम करण्याच्या सूचना दिल्या.

परभणी जिल्ह्यातील सर्व अधिकारी, कर्मचारी, बीएलओ व निवडणूक यंत्रणेच्या सामूहिक प्रयत्नांमुळे एसआयआर अभियानात जिल्ह्याची प्रगती वेगाने होत असून, आगामी कालावधीत शंभर टक्के संगणकीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## 26 जुलै रोजी 'सिल्क व मिल्क' शेतकरी मेळाव्याचे आयोजन

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी :** जिल्ह्यात रेशीम उद्योगाला चालना मिळण्यासाठी शेतकऱ्यांसाठी रविवार, दि. 26 जुलै 2026 रोजी सकाळी 11 वाजता वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील कृषी महाविद्यालयाच्या ऑडिटोरियम मध्ये 'सिल्क व मिल्क' शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

कृषी विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, रेशीम विभाग आणि केंद्रीय रेशीम मंडळ, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या मेळाव्यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या मेळाव्यास उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा रेशीम विकास अधिकारी यांनी केले आहे.

## वनामकृविच्या परभणी कृषि महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वृक्षारोपण

हिंदु प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :-**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत कृषि महाविद्यालय, परभणी येथील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने दिनांक २३ जुलै २०२६ रोजी महाविद्यालय परिसरात भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.




कार्यक्रमाची सुरुवात शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आली. या उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरात विविध प्रजातींच्या १८० वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण आणि हरित परिसर निर्मितीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमातून वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित करण्यात आली.

यावेळी मार्गदर्शन करताना शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी "झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश देत प्रत्येकाने वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प करावा, असे आवाहन केले. तसेच कृषि महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रवीण वैद्य यांनी महाविद्यालय परिसरात १,००० वृक्ष लागवडीचा संकल्प जाहीर केला असून, या वृक्षारोपण मोहिमेची सुरुवात या कार्यक्रमातून करण्यात आली.

यावेळी विविध विभागांचे विभागप्रमुख डॉ. राजेश कदम, डॉ. पुरुषोत्तम नेहरकर, डॉ. रावसाहेब भाग्यवंत, डॉ. प्रफुल घंटे, डॉ. हरिहर कौसडीकर, डॉ. किरण जाधव, पदव्युत्तर शिक्षण प्रभारी प्रा. मकरंद भोगावकर, पदवी शिक्षण प्रभारी डॉ. दिलीप झटे, डॉ. शंकर नरवाडे, डॉ. मिर्झा बेग, डॉ. सुरेश वाईकर, राष्ट्रीय छात्र सेना (NCC) अधिकारी डॉ. जय देशमुख, श्री. विजय गारकर, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. धीरज पात्रीकर व डॉ. फरिया खान, प्राध्यापक, कर्मचारी तसेच NSS व NCC चे स्वयंसेवक मोठ्या संख्येनेकार्यक्रमाचे यशस्वी आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. धीरज पात्रीकर व डॉ. फरिया खान यांनी केले. हा उपक्रम पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण करण्याबरोबरच महाविद्यालय परिसर अधिक हिरवागार, स्वच्छ व पर्यावरणपूरक करण्याचा निर्धार करण्यात आला.

## विनम्र चातुर्मासानिमित्त 26 जुलैला मंगल कलश स्थापना व भव्य शोभायात्रा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** श्री खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत व श्री १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, राजाबाजार यांच्या वतीने 'विनम्र चातुर्मास-२०२६' निमित्त रविवार (२६ जुलै) रोजी परम पूज्य उच्चारणाचार्य १०८ आचार्य श्री विनम्रसागरजी महामुनिराज यांच्या सान्निध्यात भव्य मंगल कलश स्थापना, शोभायात्रा व महाप्रसादीचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी १२.१५ वाजता राजाबाजार येथून शोभायात्रेला प्रारंभ होऊन १२.४५ वाजता हीराकाका प्रांगणात मंगल कलश स्थापना होईल. प्रख्यात जैन संगीतकार सुधीरजी जैन (उज्जैन) यांचे भक्तिमय सादरीकरण होणार असून सायंकाळी ५ ते ७ या वेळेत महाप्रसादीचे आयोजन करण्यात आले आहे.

# 'विकसित भारत @2047'साठी छत्रपती संभाजीनगरची मोठी झेप; सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिटला 'मित्र' संस्थेची साथ

## दीर्घकालीन विकास आराखडा सादर; उद्योग, पर्यटन, शिक्षण, वाहतूक व तंत्रज्ञानाधारित शहर उभारणीवर भर

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विकसित भारत @2047 आणि विकसित महाराष्ट्राच्या ध्येयाशी सुसंगत राहून छत्रपती संभाजीनगरचा शाश्वत व दूरदृष्टीपूर्ण विकास साधण्यासाठी महानगरपालिकेने 'सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिट' (सीटीयू) स्थापन केले आहे. या युनिटच्या माध्यमातून शहराच्या दीर्घकालीन विकास आराखड्याचे सादरीकरण शुक्रवारी महापौर समीर राजूरकर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) संस्थेसोबत लवकरच सामंजस्य करार करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.



बैठकीस स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद, आयुक्त अमोल येडगे, शहर अभियंता संजय कोंबडे, उपायुक्त नंदकिशोर भोंबे, 'मित्र' संस्थेचे वरिष्ठ सल्लागार निखिल नानगुडे, क्षेत्र तज्ज्ञ आनंद जोशी तसेच महानगरपालिकेचे विभागप्रमुख उपस्थित होते.

सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिटने औद्योगिक विकास, पर्यटन व वारसा संवर्धन, शिक्षण केंद्र म्हणून शहराची उभारणी, तंत्रज्ञानाधारित प्रशासन, ऊर्जा वितरण व्यवस्था, तलाव व जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, वाहतूक व सार्वजनिक परिवहन, महापालिकेची आर्थिक क्षमता वाढविणे, रस्त्यांचे आधुनिकीकरण आणि पादचारी सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवरील विकास आराखडा सादर केला.

महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात सीटीयूकरिता निधीची तरतूद करण्यात आली असून, या युनिटमार्फत विकास प्रकल्पांचे नियोजन, प्राधान्यक्रम निश्चिती, डेटा-आधारित देखरेख, परिणाममापन आणि प्रभावी अंमलबजावणीवर भर दिला जाणार आहे. 'मित्र' संस्थेच्या सहकार्यामुळे तांत्रिक मार्गदर्शन, प्रकल्प व्यवस्थापन, तज्ज्ञ मनुष्यबळ आणि आधुनिक मॉनिटरिंग प्रणाली उपलब्ध होणार आहे.

यावेळी महापौर समीर राजूरकर यांनी छत्रपती संभाजीनगरला उद्योग, पर्यटन, शिक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील राष्ट्रीय दर्जाचे शहर बनविण्याचा निर्धार व्यक्त केला. स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी सीटीयूमुळे विकासकामांना दिशा, पारदर्शकता आणि गती मिळेल, असे सांगितले. आयुक्त अमोल येडगे यांनी हे युनिट शहर नियोजनासाठी 'थिंक टँक' म्हणून काम करेल व जागतिक दर्जाचा विकास आराखडा तयार करण्यास मदत करेल, असे स्पष्ट केले.

अजिंठा-वेरूळ लेण्या, दौलताबाद किल्ला, बीबी का मकबरा, औद्योगिक क्षमता, दर्जेदार शैक्षणिक संस्था आणि वाढती गुंतवणूक यांसारख्या शहराच्या बलस्थानांचा प्रभावी उपयोग करून छत्रपती संभाजीनगरला देशातील अग्रगण्य विकसित शहरांमध्ये स्थान मिळवून देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# सीडीआरच्या आधारे हर्सूल पोलिसांची धडक कारवाई; सराईत घरफोडी करणाऱ्यास अटक, तीन गुन्हे उघडकीस

हिंदू प्रकाशवार्ता / प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** हर्सूल पोलीस ठाण्याच्या विशेष डीबी पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे अवघ्या काही दिवसांतच हर्सूल परिसराजवळ घरफोडी करणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला बेड्या ठोकल्या आहेत. जाहेद उर्फ पतलू जावेद शहा (वय २०, रा. हर्सूल) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून आतापर्यंत तीन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. हर्सूल पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाढत्या घरफोडीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तालय व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक समांतर तपास करत होते. यादरम्यान, आज रोजी हर्सूल पोलीस ठाण्याच्या विशेष डीबी पथकास मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी जाहेद उर्फ पतलू पिता जावेद शहा हा मिळून आल्याने त्यास तात्काळ ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी त्याच्याकडे कसून विचारपूस केली असता, त्याने हर्सूल पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. त्याच्याविरुद्ध हर्सूल पोलीस ठाण्यात नुसार कलम ३३१(१), ३०५ भारतीय न्याय संहिता (BNS) अन्वये गुन्हा दाखल करून त्यास अटक करण्यात आली आहे. आणखी एका घरफोडीची कबुली दिली असून, अशा प्रकारे आतापर्यंत त्याने तीन घरफोडी केल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर यशस्वी कारवाई हर्सूल पोलीस ठाण्याच्या डीबी पथकातील ए.एस. आय शेवाळे, पोलीस अंमलदार तडवी, जायभाये आणि सिंगल यांनी पार पाडली. या पथकाने अत्यंत वेगाने आणि तांत्रिक कौशल्याचा वापर करून घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज आणि सीडीआर ॲनालिसिस करून आरोपीचा शोध घेतला आणि काल त्यास शिताफीने ताब्यात घेतले. आरोपीने अद्यापपर्यंत तीन घरफोडीची कबुली दिली असून, चोरीचा माल हस्तगत करणे व इतर गुन्ह्यांचा सखोल तपास करण्यासाठी त्यास पोलीस कोठडी मिळण्या करिता न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने आरोपीला २८ जुलै पर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून, हर्सूल पोलिसांकडून याप्रकरणी पुढील कायदेशीर तपास वेगाने सुरू आहे.

# लोकमान्य टिळक जयंतीनिमित्त घाटीत अभिवादन



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी लोकमान्य टिळक यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमास उपअधिष्ठाता डॉ. के. डी. गर्कल, विभागप्रमुख डॉ. प्रभा खैरे-मोरे, डॉ. बीना गढीया, नोडल अधिकारी डॉ. सलमान शेख, प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत कुमावत, ग्रंथपाल डॉ. संतोष शेळके, लिपिक मुराद बेग यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# ओबीसी मोर्चाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण

## कॅबिनेट मंत्री अतुल सावे, डॉ. भागवत कराड व किशोर शितोळे यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वाटप

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय जनता पक्षाच्या छत्रपती संभाजीनगर शहर ओबीसी मोर्चाच्या नवनियुक्त कार्यकारिणी सदस्यांना नियुक्तिपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे, माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भागवत कराड तसेच भाजप शहराध्यक्ष किशोर शितोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.



यावेळी मान्यवरांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. ओबीसी समाजाच्या हितासाठी कार्य करत संघटना अधिक बळकट करण्यासाठी तसेच भारतीय जनता पक्षाची विचारधारा आणि शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी एकजुटीने व सक्रियपणे कार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाला ओबीसी मोर्चाचे शहराध्यक्ष ज्ञानेश्वर बोरसे, मंडळ अध्यक्ष ऋषिकेश भालेराव, नगरसेवक पदमसिंग राजपूत, नगरसेविका सविता कुलकर्णी, कैलास चव्हाण यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लायन्स प्रांत 3234-एच2च्या 'सूर्योदय' कॅबिनेट पदग्रहणाचा जल्लोष; 100 कोटींच्या सेवा प्रकल्पांची घोषणा

## 26 जुलै रोजी शहरात पदग्रहण सोहळा; 40 कोटींच्या मेडिकल पार्कसह 25 कोटींच्या आय हॉस्पिटल विस्ताराचे भूमिपूजन

**हिंदू प्रकाशवार्ता :** प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** लायन्स क्लब्स आंतरराष्ट्रीय प्रांत ३२३४-एच२च्या सन २०२६-२७ या सेवावर्षासाठीच्या नवीन कॅबिनेटचा पदग्रहण सोहळा 'सूर्योदय' या नावाने रविवारी (२६ जुलै) बीड बायपासवरील एमआयटी कॉलेजच्या मंथन हॉलमध्ये होणार आहे. नवनियुक्त प्रांतीय गव्हर्नर लायन राहुल औसेकर यांच्या नेतृत्वाखाली सुरू होणाऱ्या नवीन सेवावर्षात १४ जिल्ह्यांमध्ये तब्बल १०० कोटी रुपयांच्या कायमस्वरूपी सेवा प्रकल्पांची घोषणा करण्यात आली आहे.

लायन्स आय हॉस्पिटलमध्ये शुक्रवारी झालेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. सकाळी ९ वाजता शोभायात्रेने कार्यक्रमाची सुरुवात होणार असून, सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत मुख्य पदग्रहण सोहळा पार पडेल. त्यानंतर स्नेहभोजन आणि दुपारी नवीन कार्यकाळाची पहिली कॅबिनेट बैठक होईल.



या सोहळ्याचे पदग्रहण अधिकारी म्हणून एलसीआयएफचे चेअरमन व माजी आंतरराष्ट्रीय अध्यक्ष लायन ए. पी. सिंग उपस्थित राहणार आहेत. तसेच एलसीआयएफ ट्रस्टी लायन जी. एस. व्होरा, लोकमत माध्यम समूहाचे मुख्य संपादक लायन राजेंद्र दर्डा, लायन डॉ. नवल मालू, लायन राज मुच्छाल, लायन जितेंद्र मेहता आणि एमआयटीचे संचालक मुनिश शर्मा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

नवीन नेतृत्वात प्रांतीय गव्हर्नर राहुल औसेकर यांच्यासह प्रथम उपप्रांतीय गव्हर्नर योगेश जायस्वाल, द्वितीय उपप्रांतीय गव्हर्नर सुप्रिया कोटवाल, कॅबिनेट सचिव जितेंद्र महाजन आणि कॅबिनेट कोषाध्यक्ष मोरेश्वर कुलकर्णी यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. कार्यक्रमाचे संयोजन स्मिता मालपाणी व नंदकिशोर मालपाणी करत आहेत.

पत्रकार परिषदेत राहुल औसेकर यांनी सांगितले की, सेवा वर्षात दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

# बाबरा येथे महारक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; 29 जणांचे रक्तदान, वृक्षारोपणाने पर्यावरणाचा संदेश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** फुलंब्री तालुक्यातील बाबरा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त, माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त तसेच भाजप जिल्हाध्यक्ष तथा आमदार सुहास शिरसाठ यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी, वडोदबाजार मंडळाच्या वतीने महारक्तदान शिबिर व वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला परिसरातील नागरिक, युवक आणि कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरात २९ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.



यावेळी अजिनाथ सोनवणे, अभिलाष सोनवणे, सोमीनाथ सोनवणे, जगन दाढे, सोमनाथ भालेराव, ज्ञानेश्वर चोपडे, माधवराव जाधव, रवी पवार, कैलास गायके, सुनील तायडे, राजू पांडे, प्रकाश पायगव्हाण, संजय त्रिभुवन, डॉ. मिनाजोद्दीन शेख, खुशालराव पवार, धनंजय महाजन, प्रवीण वाघ आदी उपस्थित होते.

# नागसेनवन येथेकबड्डी दिवस उत्साहात साजरा

**छत्रपती संभाजीनगर :** कबड्डी महर्षी शंकरराव साळवी (बुवा) यांचा जन्मदिवस हा महाराष्ट्रात कबड्डी दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय नागसेनवन येथे कबड्डी महर्षी शंकरराव साळवी (बुवा) यांचा जन्मदिवस कबड्डी दिवस म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा अधिकारी रेखा परदेशी यांनी शंकरराव साळवी (बुवा) यांच्याकबड्डी खेळातील योगदानाविषयी माहिती दिली व उपस्थित विद्यार्थी खेळाडूंना कबड्डी खेळाचे महत्त्व आणि शारीरिक तंदुरुस्तीचे महत्व सांगितले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ गोरे यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास कार्यालयीन अधीक्षक राजू पटेकर ,वैजनाथ सूर्यवंशी, डॉ. विजय आडे डॉ. गणेश खिलारे उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्रीडा विभागातील प्रा.सुनील गायसूमद्रे, डॉ राहुल अहिरे ' कुणाल साळवे आदींनी परिश्रम घेतले.



# शासकीय कर्करोग रुग्णालयात दंत व मुख कर्करोग तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयाच्या सामाजिक दंतशास्त्र विभागातर्फे शासकीय कर्करोग रुग्णालयात दंत तपासणी व मुख कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात ५० हून अधिक रुग्णांची तपासणी करून आवश्यक उपचारांसाठी संदर्भ सेवा उपलब्ध करून देण्यात आली.



घाटीचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड यांच्या सहकार्याने तसेच शासकीय दंत महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. माया इंदूरकर आणि सामाजिक दंतशास्त्र विभागप्रमुख डॉ. जे. बी. वठार यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त इंडियन डेंटल असोसिएशनच्या स्थानिक शाखेच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमाला रुग्णांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

शिबिरात दंत तपासणीबरोबरच मुख कर्करोगाचे लवकर निदान करण्यासाठी विशेष तपासणी करण्यात आली. तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणाम, मुख कर्करोगाची प्रारंभिक लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि नियमित दंत तपासणीचे महत्त्व याबाबत रुग्णांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी उपअधिष्ठाता डॉ. किशोर महाले, डॉ. शिरीष खेडगीकर, शिबिर समन्वयक डॉ. हर्षल बाफना तसेच इंडियन डेंटल असोसिएशनचे डॉ. सोनाली गायकवाड आणि डॉ. शुभंकर नांदखेडकर उपस्थित होते. डॉ. श्रुती पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. स्वराली तरवडगे, युक्ता टेंबूलकर, देवयांशी त्रिपाठी आणि सूरज कुमार यांनी रुग्णांची तपासणी केली.

# जि.प.प्रशाला सोयगाव येथे गुणवंत विद्यार्थी यांचा सन्मान सोहळा उत्साहात संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**सोयगाव,दि.२४ जुलै :** जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथे राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एन.एन.एम.एस.)परीक्षा गुणवंत विद्यार्थी व इस्त्रो सहल निवड झालेले विद्यार्थी वैष्णवी कडुबा ढगे,देवयानी गोपाल आवटे,नेहा शिवदास आस्वार,अक्षरा परशुराम पंडित,पालक भागवत गायकवाड,देवयानी निलेश मिसाळ,तेजस समाधान भोकरे,गायत्री भगवान बावस्कर,पूजा शिवाजी बावस्कर,प्रांजली राजेंद्र खलसे,वृषाली गोपाल साळुंके,पार्थ समाधान इंगळे या विद्यार्थ्यांचा व त्यांचे मार्गदर्शक शिक्षक भास्कर चौधरी,सचिन ढगे,संगीता सोनवणे, शाळेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड यांचा जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई काळे यांचे मार्गदर्शनातून व तेजस्विनी काळे यांचे संकल्पनेतून स्वातंत्र्य सेनानी बाबुरावजी काळे गुणवत्ता पुरस्कार देऊन या विद्यार्थ्यांना व गुरुजनांना सन्मानित करण्यात आले.



यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष पुष्पाताई काळे होत्या तर प्रमुख अतिथी सभापती उत्तम चव्हाण,गोंदेगाव गट जिल्हा परिषद सदस्य सुनीताताई चव्हाण यांचे पती शेखर चव्हाण,पंचायत समिती सदस्य जयश्री पवार याचे पती गजानन पवार सामाजिक कार्यक्रम संकल्पक तेजस्विनी काळे,सामाजिक कार्यकर्ते संजय शहापूरकर,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनील ठोंबरे,उपाध्यक्ष भारती भागवत गायकवाड,सदस्य वाल्मीक चव्हाण व सर्व पदाधिकारी,माजी विद्यार्थी संघाचे प्रा.निलेश गाडेकर व पदाधिकारी,खरेदी विक्री संघाचे संचालक मयूर मनगटे,शिक्षण प्रेमी अरुण सोहनी,विजय गव्हाड,गटशिक्षणाधिकारी यांचे तर्फे केंद्र प्रमुख फिरोज तडवी,मुख्याध्यापक जंगलातांडा रामदास फुसे,केंद्र शाळा किरणकुमार पाटील,गोपाल चौधरी,दीपक बावस्कर , गजानन ताडे,दिलीप इंगळे,गजानन मख,नितेश गवादे यांचे सह शिक्षक मित्र परिवार उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांचा स्वागतपर सत्कार प्रशालेचे वतीने मुख्याध्यापक व शिक्षक यांनी केला.

याप्रसंगी बोलताना पुष्पाताई काळे यांनी विद्यार्थी व शिक्षक यांचे कौतुक करून अभिनंदन केले,व भविष्यात उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या,शाळेच्या सर्व अडचणी सोडविण्यासाठी शाळेचे पालकत्व स्वीकारून काम करणार आहोत असे आश्वासन दिले.यावेळी मान्यवरांची समायोचीत भाषणे पार पडली.सूत्र संचलन दौलतसिंग परदेशी आभार भास्कर चौधरी यांनी मानले.

# प्राथमिक आरोग्य केंद्र शिवना येथे 'हिरकणी कक्षा'चे थाटात उद्घाटन

## जि. प. सदस्य कु. निकिताताई राजुबाबा काळे यांच्या हस्ते फीत कापून लोकार्पण

**अजींठा :** येथील प्राथमिक आरोग्य केंद्र शिवना येथे स्तनदा माता आणि त्यांच्या बाळांच्या सुविधेसाठी उभारण्यात आलेल्या विशेष 'हिरकणी कक्षा'चे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्या कु. निकिताताई राजुबाबा काळे यांच्या शुभहस्ते फीत कापून अत्यंत उत्साहात पार पडले.

आरोग्य केंद्रात उपचारासाठी किंवा कामासाठी येणाऱ्या स्तनदा मातांना आपल्या लहान बाळांना सुरक्षित, एकांत आणि स्वच्छ वातावरणात स्तनपान करवता यावे, या सामाजिक उद्देशाने या कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे.




**या प्रसंगी प्रमुख उपस्थिती:** मा. राजुबाबा काळे (ज्येष्ठ नेते) मा. शेख सलीम शेख भिकन (पंचायत समिती सदस्य) मा. किशोर जगताप सर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आकाश दौड आणि डॉ. शिवाजी सपकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी व आशा सेविका यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी परिसरातील स्तनदा माता मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उपस्थितांनी या कौतुकास्पद उपक्रमाचे स्वागत केले.

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911